# रचनावादी शिक्षणाचे आधार

**बहुविध बुद्धिमत्तांचा विचार**

- मानसशास्त्रज्ञ हॉवर्ड गार्डनर (१९४२) यांनी आपल्या 'फ्रेम्स ऑव्ह माईंड' (१९८३) या ग्रंथात बुद्धिमत्तेविषयीचा हा नवा विचार मांडला.

- या नव्या विचाराने, बुद्धिमत्तेविषयीच्या पारंपरिक समजुतीला धक्का दिला.

- बहुविध बुद्धिमत्तांचा सिद्धांत असे सांगतो की,

- बुद्धिमत्ता एक नसून अनेक आहेत,
- बुद्धिमत्ता आनुवंशिक नाही पण ती उपजत आहे.
- संधी मिळाली असता बुद्धिमत्ता वाढू शकते.
- प्रत्येक व्यक्तीलाच सर्व बुद्धिमत्ता कमी-अधिक प्रमाणांत मिळाल्या आहेत,
- परंतु, प्रत्येकाला लाभलेला बुद्धिमत्तांचा पट वेगळा असतो.

**बहुविध बुद्धिमत्तांचा विचार (Theory of Multiple Intelligences)**

- हॉवर्ड गार्डनर यांनी बुद्धिमत्तांचे आठ प्रकार सांगितले आहेत:

**१. भाषिक - वाचिक बुद्धिमत्ता (Linguistic Intelligences)**

- भाषिक व्यवहारात रस व गती.
- विविध भाषांवर प्रभुत्व.
- वैचारिक व ललित वाङ्मयनिर्मितीकडे कल व गती.

**२. तार्किक-गणिती बुद्धिमत्ता (Logical-Mathematical Intelligence)**

- तार्किक विचारक्षमता प्रभावी.
- अमूर्त बाबींत व विचारांत रस.
- विश्लेषक बुद्धी.
- शास्त्रांच्या किंवा गणिताच्या क्षेत्रांचे आकर्षण.

**३. सांगितिक बुद्धिमत्ता (Musical Intelligence)**

- आवाजाची संवेदनशीलता.
- ताल, लय यांचे आकलन व वापर.

- गायक, वादक, संगीतकार ही कार्यक्षेत्रे.

### ४. अवकाशीय बुद्धिमत्ता (Spatial Intelligence)

- पाहिलेल्या रचना, आकार यांचे मानसचित्र तयार करता येणे.
- अंतरांचा अंदाज येणे.
- भौगोलिक नकाशा तयार करता येणे, समजणे.
- चित्रकार, वास्तुरचनाकार, शिल्पकार, अभियंता, शल्यविशारद ही कार्यक्षेत्रे.

### 5. शारीर-स्नायुविषयक बुद्धिमत्ता (Bodily-Kinesthetic Intelligence)

- शरीराचा तोल, शारीरिक हालचाली यांवर चांगले नियंत्रण.
- शारीर-भाषेकरवी भावना व्यक्त करण्याची ताकद.
- नर्तक, खेळाडू, अभिनेते, शल्यविशारद अशी कार्यक्षेत्रे.

### ६. निसर्गविषयक बुद्धिमत्ता (Naturalist Intelligence)

- निसर्गाची आवड.
- निसर्गातील गोष्टींच्या संदर्भात निरीक्षण, आकलन, संघटन, वर्गीकरण यांमध्येरस व गती.
- वनस्पती, प्राणी इत्यादी नैसर्गिक बाबींशी समरस होता येते.
- निसर्गविषयक कार्यक्षेत्रे.

### ७. आंतर-व्यक्ती बुद्धिमत्ता (Inter-personal Intelligence)

- दुसऱ्यांच्या भावना समजून घेता येणे, त्यांच्याशी जुळवून घेता येणे; प्रभाव पाडता येणे.
- अन्य लोकांविषयी आवश्यक तेथे कणव, सहानुभूती यांचा आढळ व वापर.
- शिक्षक पेशा, नेतृत्वाची क्षेत्रे अशी कार्यक्षेत्रे.

### ८. आंतर-व्यक्ती बुद्धिमत्ता (Intra-personal Intelligence)

- स्वतःच्या भाव-भावनांची जाणीव असणे, ओळखता येणे.
- स्वतःच्या भाव-भावनांवर नियंत्रण ठेवता येणे.
- स्वतःच्या मनाची शक्ती ओळखून निर्णय घेता येणे, मनाचा खोलवर वेध घेता येणे.
- सामाजिक, अध्यात्मिक नेतृत्वाची कार्यक्षेत्रे.

**बहुविध बुद्धिमत्तांचा विचार व शिक्षण**

- बुद्धिमत्तेच्या बाबतीत प्रत्येक मूल वेगळे आहे; हे लक्षात घेऊन शिक्षणव्यवहार करावा लागतो.

- उपजत प्राप्त झालेली बुद्धिमत्ता व व्यवहारातील आवड, कल, कुशलता यांचा संबंध जवळचा असतो.

- उपजत प्राप्त झालेली बुद्धिमत्ता व शिकण्याच्या शैली, आकलनाची क्षमता यांचा संबंध जवळचा असतो.

- शालेय वर्गात प्रत्येकजण कोणत्यातरी बाबतीत हुशार व काही बाबतीत ढ असतो.

- प्रत्येक बालकातील बुद्धिमत्ता ओळखून त्यांनुसार वर्गांमधील उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक असते.

- विचारपूर्वक आखलेले अनुभव व संधी मिळाल्यास विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढू शकते.

- शालेय शिक्षणात, विद्यार्थ्यांकडे, त्यांच्या विविध बुद्धिमत्तांच्या अंगाने पाहणे गरजेचे आहे.

- शाळेची रचना व वर्गातील व्यवस्था बदलणे गरजेचे आहे.

- वर्गांमधून व्यक्तिगत शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे.

- वर्गांमधील विद्यार्थ्यांची हुशार व ढ अशी होणारी वर्गवारी प्रयत्नपूर्वक संपविली पाहिजे.

- प्रत्येक विद्यार्थ्यांमधील बुद्धिमत्तांचा शोध घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे हे शाळेचे व शिक्षकांचे काम आहे.

- विविध बुद्धिमत्तांचे अनुभव सर्वच विद्यार्थ्यांना मिळतील अशी व्यवस्था शाळेत असावी लागेल.

❖